**मे.आयडियल एनर्जी प्रोजेक्ट्स लिमिटेड, खुर्सापार-किन्हाळा, बेला गावाजवळ, ता.उमरेड, जि.नागपूर येथील विद्यमान १x२७० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये अतिरीक्त २x१७५ मेगावॅट विज प्रकल्प (कोळशावर आधारीत) विस्तारीकरण प्रस्तावित प्रकल्पाची दि. १३/०५/२०२६ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे.आयडियल एनर्जी प्रोजेक्ट्स लिमिटेड, खुर्सापार-किन्हाळा, बेला गावाजवळ, ता.उमरेड, जि.नागपूर येथील विद्यमान १ x २७० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये अतिरीक्त २x१७५ मेगावॅट विज प्रकल्प (कोळशावर आधारीत) विस्तारीकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे.आयडियल एनर्जी प्रोजेक्ट्स लिमिटेड, खुर्सापार-किन्हाळा, बेला गावाजवळ, ता.उमरेड, जि.नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

## पार्श्वभूमी

मे.आयडियल एनर्जी प्रोजेक्ट्स लिमिटेड, खुर्सापार-किन्हाळा, बेला गावाजवळ, ता.उमरेड, जि.नागपूर येथील विद्यमान १ x २७० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये अतिरीक्त २x१७५ मेगावॅट विज प्रकल्प (कोळशावर आधारीत) विस्तारीकरण प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता अर्ज म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे दि. ०१/०४/२०२६ रोजी ई-मेल द्वारे सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मंडळाच्या मुख्यालयाने पत्र क्र. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-०२१३ दि. ०१/०४/२०२६ अन्वये जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. **(सहपत्र-२).**

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०९/०४/२०२६ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-३).**

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण ३ निवेदने म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-४)**. मंडळाचा आदेश दि. २१/०४/२०२६ नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-५)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत विद्यमान १ x २७० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये अतिरिक्त २x१७५ मेगावॅट विज प्रकल्प (कोळशावर आधारीत) विस्तारीकरणासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. सतिश दिवाकर मुंजे, जयतापुर, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विद्यमान प्रकल्पाच्या धुरांड्यामधून निघणाऱ्या राखेमुळे शेतकऱ्यांना त्रास होतो. प्रस्तावित प्रकल्पामुळे राखेचा त्रास दुप्पट होणार अशी शंका आहे. हा विनाशकारी प्रकल्प असून प्रकल्पास अनुमती देवू नये. परिसरातील शेती ना-पीक होईल. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | विद्यमान प्रकल्पातील धुरांड्याची उंची २० मीटर ने कमी आहे. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, धुराड्यांची उंची ही म.प्र.नि.मंडळाच्या नियमानुसार आहे. |
| ३. | ही जनसुनावणी गावात लावायला पाहिजे. प्रकल्पास विरोध दर्शविला. | यावर उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितले की, नियमानुसार जनसुनावणी प्रकल्प स्थळी घेण्यात येते. |

२) श्री. अभिनव गोडघाटे, बेला, ता.उमरेड, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल. परिसरातील गावांची प्रगती होईल. उपस्थितांपैकी ९५ टक्के नागरीकांचा या प्रकल्पास समर्थन आहे. हा प्रकल्प झाला पाहिजे, अशी सर्वांची मागणी आहे. प्रकल्पास कुठल्याही प्रकारचा विरोध नाही. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

३) श्री. सुधिर पारवे, माजी आमदार, उमरेड विधानसभा.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | मी ऊस उत्पादक शेतकरी असून पिपळा परिसरात माझी २० एकर शेतीमध्ये ऊसाची लागवड आहे. विद्यमान प्रकल्प सुस्थितीत सूरू असून मागील जनसुनावणीमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन केलेले आहे. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | ग्रामीण भागामध्ये उद्योग आले पाहिजे. त्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल व अर्थव्यवस्था वाढेल. | |
| ३ | विस्तारीकरण प्रकल्प झाल्यास बेला व खूर्सापार येथील तरूणांना रोजगार मिळेल. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | |
| ४ | कार्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) निधीचा वापर पायाभूत सुविधा जसे की, पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य सुविधा, तसेच आकस्मिक बाबी, लग्न समारंभ इ. बाबीकरीता परिसरातील गावांत वापरण्यात यावा. | |
| ५ | बाष्पकामध्ये किंवा धुरांड्यामध्ये सुधारणांची गरज असेल तर तात्काळ करण्यात यावी. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. | |
| ६ | प्रकल्प प्रवर्तकांना विनंती केली की, आणखी काही प्रकल्प असतील तर त्यांनी उभारावे, जेणेकरून स्थानिकांना रोजगार मिळेल. | |
| ७ | या प्रकल्पास मंजूरी देण्यात यावी. | |

४) श्रीमती. किर्ती सुरणकर, माजी सदस्य, पंचायत समिती, बेला.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विद्यमान २७० मेगावॅट प्रकल्पामध्ये महिलांना घराजवळ रोजगार मिळालेला आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पामध्ये ५६० लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | स्थानिकांना रोजगार मिळण्यासाठी व परिसराच्या विकासासाठी प्रकल्प झाला पाहिजे. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | |

५) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रकल्पास समर्थन दर्शविला, रोजगार मिळेल, प्रदूषण नियंत्रणात ठेवावे. मोठ्या प्रमाणात परिसरात वृक्ष लागवड करावी व पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) करावे. प्रकल्पाचे स्वागत आहे. गावांकरीता कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी घ्यावी (CSR). रोजगारांना कौशल विकासासाठी प्रशिक्षण केंद्र उभारावे. तसेच या प्रकल्पास विना अटी व शर्तीसह परवानगी मिळावी. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

६) श्रीमती. शालू मेंडुले, माजी सभापती, पंचायत समिती, बेला उमरेड.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विद्यमान प्रकल्पामुळे गावांतील शेतकऱ्यांना कुठलाही त्रास नाही. प्रकल्पामुळे परिसराचा विकास झाला, सुविधा वाढलेल्या आहेत, स्थानिकांना रोजगार मिळालेला असून कुटूंबाचे उदरनिर्वाह होत आहे. शेतीला चांगला भाव येत असून पालेभाज्यांनाही भाव मिळत आहे व उत्पन्नात वाढ झालेली आहे. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

७) श्री. पंकज रोडे, बेला, ता.उमरेड, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | बेला गावातील ३०० ते ५०० कुंटुबांचा विद्यमान साखर कारखान्यामुळे तसेच १०० ते १५० कुंटूबांचा विद्यमान आयडीयल विज प्रकल्पामुळे उदरनिर्वाह होत आहे.. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |
| २. | गावांतील महिला रोजगारासाठी २० ते २५ कि.मी. अंतरावर असलेल्या एमआयडीसी बुटीबोरी येथे जातात. प्रस्तावित प्रकल्पामुळे त्यांना रोजगार ५ कि.मी. अंतरावर उपलब्ध होईल. | |
| ३. | प्रस्तावित प्रकल्पामुळे बेला ग्रामपंचायतीला चांगला कर मिळेल. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | |

८) श्री.विवेक तायवाडे, बेला, ता.उमरेड, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | माझ्या शेतामधील ऊस सन २०१८ पासुन विद्यमान साखर कारखान्याला देतो. तसेच प्रकल्पालगतची जमीन मागील ३ वर्षापासून ठेका पध्दतीने करतो. त्यामध्ये चांगले उत्पादन होते. तसेच मी कापसाचे देखील उत्पादन घेतो. विद्यमान प्रकल्पामुळे कापूस पिकांवर कोणतेही नुकसान झालेले नाही. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २ | प्रस्तावित प्रकल्प झाला पाहिजे. गावकऱ्यांना गावजवळ रोजगार मिळले. प्रकल्पास पाठिंबा दर्शविला. | |

**९) श्री.सचिन भाकरे, उपसरपंच, ग्रा.पं.कळमना, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रकल्पास समर्थन दर्शविला. तसेच कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CER)अंतर्गत लगतच्या प्रत्येक गावांतील रस्ते बांधावे. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २. | विद्यमान प्रकल्पाने रूग्णवाहीकेची सोय केलेली असून त्याचा फायदा इतर गावांना देखील व्हायला पाहिजे. | |

**१०)श्रीमती. सुनंदा उकंडे, माजी सरपंच, ग्रा.पं.बेला, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रकल्पामुळे गावातील बेरोजगारांना घराजवळ रोजगार मिळेल. मी सरपंच असताना ग्रामपंचायतीमध्ये वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या आमसभेत व बैठकीमध्ये कुणीही शेती नुकसानीचा मुद्दा उपस्थित केलेला नाही. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| २. | प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिकांना फायदा होईल. | |

**११) श्री. गजानन गाडगे, उपसरपंच, ग्रा.पं. बेला-खुर्सापार, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | उद्योगाने परिसरातील किन्हाळा, खुर्सापार ही गावे दत्तक घेवून विकासकामे करावी. उद्योगामार्फत बेला गावांस शुध्द पिण्याचे पाणी पूरविण्यात येते. तसेच किन्हाळा व खुर्सापार या गावांत देखील शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, गांवे दत्तक घेण्याबाबत विचार करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. |

**१२)श्री. गजानन ढगे, सदस्य, ग्रा.पं. बोरगावं-लांबट, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | उद्योगाने खुर्सापार व बोरगांव ही गावे दत्तक घ्यावी व स्थानिकांना रोजगार दयावा. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, गांवे दत्तक घेण्याबाबत विचार करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. |

**१३)श्री.सुप्रित भोयर, सावंगी, ता.उमरेड, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | या प्रकल्पास माझे व संपुर्ण गावाचे समर्थन आहे. कोळसा व राख वाहतुकी दरम्यान रस्त्यावर पडलेल्या राखेमुळे धुळीकणं निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे ट्रकवर क्षमतेपेक्षा जास्त | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कोळशाची वाहतूक व राखेच्या धुळीकरीता योग्य उपाययोजना करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | मालवाहतुक करण्यास प्रतीबंध केला पाहिजे. |

श्री. अनुप खांडे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर, यांनी प्रकल्प सल्लागारांना सादरीकरणामध्ये मृदा संधारण व जलपुर्नभरण या बाबींचा समावेश करण्याबाबत सुचविले. तसेच प्रकल्प प्रवर्तकांना सांगितले की, कार्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत निधीचा वापर परिसरातील १० ते १५ गावांमध्ये करावा, पिण्याच्या पाण्याची व इतर मुलभूत गरजांची व्यवस्था करावी. जलपुर्नभरण प्रक्रिया उभारण्यात यावी. जैवविविधता, वनरचना व जलाशय इ. बाबी पर्यावरण मुल्यांकन अहवालामध्ये समाविष्ट कराव्यात. स्थानिकांना रोजगारासाठी कौशल विकास प्रशिक्षण दयावे. उपस्थित जनसमुदायास त्यांचे काही आक्षेप, सूचना व टिका-टिप्पणी असल्यास सांगावे असे आव्हान केले. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे सादर करण्याबाबत सुचित केले. उपरोक्त नागरीकांनी उपस्थित केलेले मुद्दे तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे यांची नोंद घेवून शासनाकडे पाठविण्यात येईल.

सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर